**दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, कवठेमहांकाळ, जि.सांगली यांच्या न्यायालयात.**

**(अरुण र. व्यवहारे यांचे समक्ष)**

CNRNO.MHSN070010462019

**नियमित दिवाणी दावा क्रमांक १३१/२०१९ नि.क्र.५ वरील आदेश.**

वादी - तानाजी तातोबा मोहिते

विरुध्द

प्रतिवादीं- बापू तातोबा मोहिते व इतर.

..........................................................................................................

वादीतर्फे विधिज्ञ - श्री.एफ.एन.कोतवाल

प्रतिवादींतर्फे विधिज्ञ - श्री. व्ही.बी. शिंदे

..........................................................................................................

**निशाणी क्र. ५ वरील आदेश.**

प्रस्तुतचा अर्ज वादीने दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८, चे आदेशिका ३९ नियम १ व २ अन्वये प्रतिवादी अगर त्यांच्या तर्फे इतर इसमांनी मौजे नागज, ता. कवठेमहांकाळ येथील गट क्रमांक १००७, १०१०, १०११, १०१४, १०१५, १०१६, १०१७, १०१८ व १०२० मधील वादीच्या २/३ हिश्श्याच्या मिळकतीतील शांततामय कब्जे वहिवाटीस हरकत, अडथळा करु नये करिता अंतरिम मनाई आदेश मिळणेकरता दाखल केलेला आहे.

०२. जिल्हा तुकडी सांगली, तालुका व पोटतुकडी कवठेमहांकाळ पैकी मौजे नागज येथील गट क्र. १००७, १०१०, १०११, १०१४, १०१५, १०१६, १०१७,

१०१८ व १०२० यापैकी समाईकातील प्रत्येकी २/३ हिस्सेची मिळकत संपूर्ण गटक्रमांकाच्या चतुःसिमेसह खालीलप्रमाणे-

| ग.क्र. | पूर्वेस | पश्चिमेस | दक्षीणेस | उत्तरेस |
|---|---|---|---|---|
| १००७ | कुडलापूर शिव | ग.क्र.१००२ | ओढापात्र | वाघोली शिव |
| १०१० | कुडलापूर शिव | ग.क्र.१००२ | ओढापात्र | वाघोली शिव |
| १०११ | कुडलापूर शिव | ग.क्र.१००२ | ओढापात्र | वाघोली शिव |
| १०१४ | कुडलापूर शिव | ग.क्र.१००२ | ओढापात्र | वाघोली शिव |
| १०१५ | कुडलापूर शिव | ग.क्र.१००२ | ओढापात्र | वाघोली शिव |
| १०१६ | कुडलापूर शिव | ग.क्र.१००२ | ओढापात्र | वाघोली शिव |
| १०१७ | कुडलापूर शिव | ग.क्र.१००२ | ओढापात्र | वाघोली शिव |
| १०१८ | कुडलापूर शिव | ग.क्र.१००२ | ओढापात्र | वाघोली शिव |
| १०२० | कुडलापूर शिव | ग.क्र.१००२ | ओढापात्र | वाघोली शिव |

०३. वादीच्या कथनाप्रमाणे ग.क्र. ९९५ ही मिळकत मूळ पुरुष तातोबा भीमराव मोहिते यांची वडिलार्जित मिळकत होती. त्यांनी त्यांच्या हयातीमध्ये सदरची मिळकत वाटपाने त्यांचा मोठा मुलगा म्हणजेच प्रतिवादी क्र. १ बापू तातोबा माहिते यांना दिली होती. त्यामुळे प्रतिवादी क्र. १ यास दावा मिळकतीमध्ये कोणताही हक्क दिलेला नव्हता. ग.क्र. ९९५ ही मिळकत प्रतिवादी क्र. १ ने स्वतःच्या गरजेपोटी दि. १०.०२.१९९४ रोजी विक्री केलेली आहे व तेव्हापासून खरेदीदार मंगल वसंत शिंदे

यांचा त्या मिळकतीवर ताबा आहे. वादी व प्रतिवादी क्र. १ चे वडील तातोबा हे दि. २०.०६.१९९५ रोजी मयत झालेले आहेत. त्यांच्या मयतानंतर वादी,मयत रघुनाथ व संभाजी अशा तिघांमध्ये वाद मिळकतींचे सरस निरस मानाने दि. ०५.०७.१९९५ रोजी वाटप झालेले आहे. त्या वाटपपत्रास प्रतिवादी क्र.१ ची देखील संमत्ती आहे. त्याप्रमाणे वादमिळकतीमध्ये वादीचा १/३ हिस्सा आहे. त्यानंतर वादीने रघुनाथ यांचा १/३ हिस्सा देखील दि. २१.०९.२०१० रोजी नोंदणीकृत खरेदीदस्ताआधारे विकत घेतलेला आहे. एकंदरीत, वाटपाने प्राप्त झालेला १/३ हिस्सा व विकत घेतलेला १/३ हिस्सा असा एकूण २/३ हिश्श्याचा वादी मालक व कब्जेवहिवाटदार आहे. वाद मिळकतीमध्ये वादीच्या हिश्श्यामध्ये प्रतिवादी क्र. १ चा कोणताही हिस्सा येत नाही. असे असताना देखील प्रतिवादी क्र. १ ने त्यांचे वडील तातोबा भीमराव मोहिते यांचे निधनानंतर वारसदार म्हणून त्यांचे नावाची नोंद फेरफार क्र. १७४५ अन्वये करुन घेतलेली आहे. तसेच सदर नोंदीचा गैरफायदा घेवून प्रतिवादी क्र. २ याच्यासोबत दि. ०७.१२.२००५ रोजी नोंद साठेकरार देखील केलेला आहे. मुळात सदरचा व्यवहार बेकायदेशिर व बिनकब्जाचा आहे.

०४. वादीने पुढे असे कथन केले आहे की, वादी भारतीय सैन्य दलातून निवृत्त झालेले आहेत. नोकर व मुजुरांच्या सहाय्याने ते वादमिळकत कसत आहेत. दि. ०२.१२.२०१९ रोजी ते दावा मिळकतीत गेले असता प्रतिवादी क्र. १ ने वादीच्या दावा मिळकतीवरील कब्जे वहिवाटीस हरकत, अडथळा केला व वादमिळकतीमध्ये माझा हिस्सा आहे असे बोलून दाखविले. त्यामुळे प्रस्तुतचा अर्ज दाखल करणे भाग पडले आहे.

०५. दाव्याचा गुणदोषावर निर्णय होण्यास बराच कालावधी लागणार आहे. परंतु तोपर्यंत प्रतिवादी क्र. १ ने वादीच्या दावा मिळकतीवरील शांततामय कब्जे

वहिवाटीस हरकत, अडथळा केल्यास वादीचे पैशात न भरुन येणारे असे नुकसान होणार आहे. उलटपक्षी मनाई आदेश दिल्यास प्रतिवादीचे कोणतेही नुकसान होणार नाही. वादीच्या कथनांनुसार, प्रथमदर्शनी बाजू व न्यायाचा समतोल त्याच्या बाजूने आहे. दाव्यास निकाली निघण्यास विलंब लागेल त्यामुळे वादीने अंतरिम मनाई आदेशाची मागणी केलेली आहे.

०६. प्रतिवादी क्र. १ ते ३ यांनी दाव्यामध्ये हजर होवून त्यांचा एकत्रीत लेखी जबाब नि. क्र. ६३ अन्वये दाखल केलेला आहे. सदर प्रतिवादींनी वाद पत्रातील बहुतांश कथने नाकारलेली आहेत. सदर प्रतिवादींच्या कथनानुसार, वादी व प्रतिवादी क्र. १ चे वडील तातोबा मोहिते मयत झाल्यानंतर वादमिळकतींना वारसदार म्हणून प्रतिवादी क्र. १, वादी व त्यांचे भावांच्या नावाची नोंद झालेली आहे व त्या अनुषंगाने फेरफार क्र. १७४५/अ मंजूर झालेला आहे. थोडयात, वादमिळकती वादी, प्रतिवादी क्र. १ व प्रतिवादी क्र. ३ यांचे वडिलार्जित व हिंदू एकत्र कुटुंबाच्या मिळकती आहेत. त्यांनी पुढे असे कथन केले आहे की, नागज येथील ग.क्र. ९९५ ही देखील त्यांची वडीलार्जित एकत्र कुटुंबाची मिळकत आहे. ग. क्र. ९९३ या मिळकतीस वादीने केवळ स्वतःचेच नांव दाखल करुन घेवून प्रतिवादी क्र. १ ते ३ यांना बेदखल करण्याचा प्रयत्न केलेला आहे. तसेच ग.क्र. ९९३ ला वादी व प्रतिवादी क्र.१ च्या आईस केवळ वादी वारसदार असल्याबाबत खोटे शपथपत्र दाखल केले. त्यामुळे सदरची नोंद व फेरफार क्र. ४९३४ बेकायदेशिर आहे. सदर प्रतिवादींच्या कथनानुसार, वादमिळकतींचे कधीही वाटप झालेले नाही. वादमिळकती प्रतिवादी क्र.१ व ३ यांच्या सामाईक कब्जेवहिवाटीच्या आहेत. तसेच जाहीर होवून मिळण्याची मागणी मुदतीत नाही. वादमिळकतीवर वादीची कब्जे वहिवाट नाही. प्रस्तुतचा खोटा दावा दाखल करुन वादी

वादमिळकतीवर कब्जा करु पहात आहे. सरतेशेवटी त्यांनी प्रस्तुतचा अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली.

०७. वादीचे विधिज्ञ श्री. एफ.एन.कोतवाल व प्रतिवादी क्र.१ ते ३ यांचे विधिज्ञ श्रीमती व्ही.व्ही.शिंदे यांचा सविस्तर युक्तीवाद ऐकला.

०८. अर्ज, म्हणणे, अभिलेखावरील कागदपत्रे व दोन्ही बाजुंच्या विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकता खालील वादप्रश्न माझ्या विचारार्थ निघतात. त्यावरील निष्कर्ष हे मी त्यापूढे नोंदवलेल्या कारणमिमांसेसह नोंदवित आहे.

| अ.क्र. | वादप्रश्न | निष्कर्ष. |
|---|---|---|
| १ | प्रथम दर्शनी बाजु वादीच्या बाजुने असल्याचे वादी सिध्द करतो काय? | नकारार्थी. |
| २ | सोयीस्करतेची तुला ही वादीच्या बाजूने आहे, असे वादी सिध्द करतो काय? | नकारार्थी. |
| ३ | मागणी केल्याप्रमाणे अंतरिम मनाई आदेश वादीच्या बाजूने न झाल्यास वादीचे अपरिमित असे नुकसान होणार आहे काय? | नकारार्थी. |
| ४ | आदेश काय? | अर्ज नामंजूर करण्यात येतो. |

## कारणमिमांसा.

**वादप्रशन क्र. १ ते ३ बाबत**

०९. सदरचे वादप्रश्न क्रमांक १ ते ३ हे एकमेकाशी संलग्न असल्यामुळे

पुनरावृत्ती टाळण्याकरिता ते एकत्रीत कारणेमिमांसेकरिता घेण्यात येतात.

१०. वादीच्या विधीज्ञांनी युक्तीवाद केला की, प्रतिवादी क्र. १ यास ग.क्र. ९९५ मध्ये हिस्सा देण्यात आला होता. त्यामुळे वाटपाच्यावेळी प्रतिवादी क्र.१ यास वादमिळकतीमध्ये कोणताही हिस्सा देण्यात आला नव्हता. वादमिळकतीमध्ये वादीचा २/३ हिस्सा असून त्यावर त्याचा ताबा आहे. वाटपाच्यावेळी प्रतिवादी क्र.१ ने संमत्तीदार म्हणून स्वाक्षरी देखील केलेली आहे. परंतु प्रतिवादी क्र.१ हा सातबारा उता-यावरील त्याच्या नावाच्या नोंदीचा गैरफायदा घेवून वादीच्या वादमिळकतीवरील कब्जेवहिवाटीस हरकत,अडथळा करीत आहे. उलटपक्षी प्रतिवादीच्या विधीज्ञांनी युक्तीवाद केला की, सर्व वादमिळकती आजही वडिलार्जित व अविभक्त मिळकती आहेत. तसेच वादमिळकतीवर वादीची कोणतीही कब्जे वहिवाट नाही. करिता मागणी केल्याप्रमाणे अंतरिम मनाई आदेश देता येणार नाही.

११. वादीने अभीलेखावर सर्व गटांचे सातबारे उतारे दाखल केलेले आहेत. ग.क्र.९९४ मध्ये वादी, प्रतिवादी क्र. १ व इतर प्रतिवादींची सामाईक कब्जेवहिवाट असल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते. उर्वरित गटांमध्ये देखील ग.क्र. ९९५ वगळता प्रतिवादी क्र. १ च्या नावाची नोंद सामाईक क्षेत्रामध्ये आहे. प्रतिवादीच्या कथनानुसार, फेरफार क्र. १७४५/अ अन्वये दि. २७.०६.१९९५ रोजी वादमिळकतींना वारसदार म्हणून वादी, प्रतिवादी क्र.१ व त्यांचे भावांची नोंद झालेली आहे. तसेच त्यांची बहिण नांमे ललिता हिचे नावाची नोंद इतर हक्कामध्ये झालेली आहे. सदरची नोंद तातोबा मोहिते यांच्या निधनानंतर सात दिवसांनी झालेली आहे. वादीने दि. २८.०६.१९९५ रोजीच्या वाटणीपत्रावर भिस्त ठेवली आहे. त्यामध्ये लिहून देणार म्हणून प्रतिवादी क्र. १ चे नांव नमूद आहे. सदरच्या दस्ताचे अवलोकन केले असता त्यामध्ये असे नमूद आहे की, प्रतिवादी क्र. १ ने लिहून दिले आहे की सर्व मिळकती वडीलार्जित मालकी

वहिवाटीच्या असून त्यामध्ये त्याचा काहीही संबंध नाही. मालकी हक्काने त्याची वहिवाट करण्यास त्यांची कोणतीही हरकत नाही. सदरचा दस्त अनोंदणीकृत आहे. सदरचा दस्त प्रथमदर्शनी कोणत्याच बाजूने वाटणीपत्र असल्याचा दिसून येत नाही. सदरचा दस्त हक्कसोड असल्याबाबत दिसून येतो परंतु तो दस्त अनोंदणीकृत आहे. मुळात या दस्तावरुन असे दिसून येत नाही की वादमिळकतींचे वादी व त्यांच्या भावामध्ये वाटप झाले होते व त्या वाटपास प्रतिवादी क्र. १ ची कोणतीही हरकत नव्हती. त्यामुळे सदर दस्तावरुन वादमिळकतींचे वाटप झाले होते असे प्रथमदर्शनी दिसून येत नाही.

१२. प्रतिवादी क्र. १ ने ग.क्र. ९९५ मधील मिळकत विक्री केली असली तरी तो त्याने त्याचा अविभक्त हिस्सा विक्री केल्याचे कथन केले आहे. वाद मिळकती तातोबा भीमराव मोहिते यांच्या वडिलार्जित मिळकती होत्या याबबात वाद नाही. परंतु त्या मिळकतींचे वाटप झाले याबाबत प्रथमदर्शनी पुरावा अभीलेखावर नाही. वाटप झाल्याबाबत कोणतीच फेरफार नोंद अथवा वाटपपत्र अभीलेखावर दाखल नाही. वादी दाखवू पहात असलेले वाटपपत्र वाटपाबाबतचे नसल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते. प्रतिवादींनी अभीलेखावर फेरफार क्र. ४९३४ दाखल केलेला आहे. त्यामध्ये मयत तातोबा भीमराव मोहिते व त्यांची पत्नी सोनाबाई तातोबा मोहिते यांना वादी एकमेव वारस असल्याचे नमूद आहे. सदरची नोंद ग.क्र. ९९३ करीता घेण्यात आलेली आहे. मुळात मयत तातोबा व सोनाबाई यांना वादी व्यतिरिक्त देखील इतर वारस आहेत. यावरुन असे दिसून येते की, वादी स्वच्छ हाताने या न्यायालयासमोर आलेला नाही. वादमिळकतींचे अदयाप वाटप झाले नसल्याने प्रतिवादी क्र.१ वादीसोबत सहहिस्सेदार (कोपार्सनर) आहे. सामाईक क्षेत्रातील सहहिस्सेदाराविरुध्द मनाई आदेश देता येणार नाही. कोपार्सनर यांना देखील वडिलार्जित मिळकतीमध्ये अविभक्त मिळकतीमध्ये

सामाईक कब्जेवहिवाट उपभोगण्याचा अधिकार आहे. त्यामुळे अंतरिम मनाई आदेश देवून प्रतिवादी क्र. १ यास प्रतिबंधीत करता येणार नाही. करीता वरील सर्व कारणांवरुन मी या निष्कर्षापर्यंत येतो की, वादमिळकतीमध्ये वादीचा २/३ स्वतंत्र हिस्सा आहे हे प्रथमदर्शनी सिध्द होत नाही. वादमिळकतींचे वाटप झाले असल्याचे देखील प्रथमदर्शनी सिध्द होत नाही. वादमिळकती सामाईक कब्जे वहिवाटीच्या असल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते. वादी व प्रतिवादी क्र.१ च्या नावाची नोंद सामाईक कब्जेवहिवाटदार म्हणून आहे. त्यामुळे प्रतिवादी क्र. १ विरुध्द मनाई आदेश पारीत करता येणार नाही. प्रथमदर्शनी बाजू सिध्द न झाल्याने न्यायाचा समतोल देखील वादीच्या बाजूने झुकत नाही. अंतरिम मनाई आदेश पारीत केल्यास प्रतिवादी क्र १ यास वादमिळकतींचा उपभोग घेण्यास अडचणीचे होणार आहे व गैरसोयीचे होणार आहे. करीता वादी अंतरिम मनाई आदेश मिळण्यास पात्र नाही. करिता वादप्रशन क्र. १ ते ३ चा निष्कर्ष मी नकारार्थी नोंदवित आहे.

**वादप्रश्न क्र. ४ बाबत** –

१२. वादप्रश्न क्र. १ ते ३ वरील नकारार्थी निष्कर्षावरुन वादी मागणी केल्याप्रमाणे अंतरिम मनाई आदेश मिळण्यास पात्र नाही. त्यामुळे प्रस्तुतचा अर्ज नामंजूर करणे उचित ठरते. वरील सर्व कारणांवरुन वादप्रश्न क्र.४ बाबत मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे

## आदेश

१. प्रस्तुतचा नि. क्र. ५ वरील अर्ज नामंजूर करण्यात येतो.

२. खर्चाबाबत आदेश नाही.

ARUN RAGHUNATH VYAWAHARE

Digitally signed by ARUN RAGHUNATH VYAWAHARE
Date: 2024.07.04 09:28:47 +0530

दिनांक ०२.०७.२०२४. (अरुण र. व्यवहारे )

दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,

कवठेमहांकाळ. कवठेमहांकाळ.

**Certificate**

I affirm that the contents of this P.D.F. file order is same, word to word, as per the original order.

Name of the Stenographer - H.P.Haridas
Court - CJJD and JMFC, Kavathemahankal.
Date - 02.07.2024
Order signed by the
Presiding Officer on -02.07.2024
Order uploaded on -04.07.2024